**कृपया प्रसिध्दीसाठी** **21 ऑगस्ट 2012**

## ‘बॉम्बे’ हायकोर्टाचे नाव बदलून ‘मुंबई’ करण्याची संधी पंतप्रधानानी गमावली - राम नाईक

**मुंबई, मंगळवार :** मुंबई उच्च न्यायालयाचे नाव इंग्रजीत ‘बॉम्बे’ हायकोर्टच्या ऐवजी ‘मुंबई’ करण्याची संधी उच्च न्यायालयाच्या 18 ऑगस्ट रोजी झालेल्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी गमावली. हा बदल ताबडतोब केला नाही तर पुढील पावले उचलण्याचा इशारा भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना दिला आहे. ही माहिती श्री. राम नाईक यांनी आज मुंबई येथे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

उच्च न्यायालयाचे नाव इंग्रजीतील बॉम्बे हायकोर्ट ऐवजी मुंबई हायकोर्ट करण्याच्या मागणीसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘इंग्रजीतील बॉम्बे ऐवजी मुंबई हे नाव बदलण्याचा आदेश भारत सरकारने 15 डिसेंबर 1995 रोजी काढला. त्यानुसार भारत सरकारने तसेच महाराष्ट्र सरकारनेही अनेक ठिकाणी योग्य ते बदल केले. परंतु उच्च न्यायालयात मात्र बॉम्बे हायकोर्ट असाच उल्लेख होत आहे. यासंबंधी मुख्य न्यायमूर्ति यांच्याशी पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांनी हा बदल करण्याचा पुढाकार संसदेनेच घेतला पाहिजे असे 28 एप्रिल 2006 रोजी कळविले. त्यानंतर महाराष्ट्रातील काही खासदारानी सरकारने बदल करावा म्हणून संसदेत प्रयत्न केले. तथापि ते यशस्वी झाले नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवासाठी पंतप्रधान मुंबईला येणार असल्याने त्या सोहळ्याचे औचित्य साधून तसेच मुंबईसह महाराष्ट्रातील जनतेच्या अस्मितेची जाण ठेवून बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई असे जाहिर करावे असे आवाहन मी स्वतः पंतप्रधानाना 12 ऑगस्ट रोजी पत्र पाठवून केले होते. त्यासंबंधी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना पाठपुराव्यासाठी विनंती ही केली होती. तथापि 18 ऑगस्टच्या भाषणामध्ये पंतप्रधानानी यासंबंधी घोषणा न केल्याबद्दल मी त्यांचा निषेध करतो’’.

‘‘पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी संवेदनशीलता दाखवून अधिक विलंब न लावता बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई हायकोर्ट असे योग्य त्या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन करावे, इतकेच नव्हे तर मद्रास आणि कलकत्ता या हायकोर्टांची नावेही अनुक्रमें चेन्नई आणि कोलकाता अशी करावीत. त्याचबरोबर त्यांनी 18 मे रोजी भाषण केलेल्या आयआयटी बॉम्बेचे नावही मुंबई करावे. भारत सरकारचा या मागणीबद्दल प्रतिसाद काय आहे याची माहिती ताबडतोब देण्यात यावी’’ अशी मागणीही श्री. राम नाईक यांनी पंतप्रधानांना 20 ऑगस्ट रोजी पाठविलेल्या पत्रात केली आहे.

**(कार्यालय सचिव)**